# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/11/2021 (गुरूवार)

---

**–: अवैधरित्या इलेक्ट्रीक गेंमिग मशीन द्वारे पैशाची बाजी लावून हारजितचा जुगार चालविणाऱ्या अडयावर धाड स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही :–**

दिनांक 17.11.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागात आरोपी शोध बाबत पेट्रोलींग करीत असतांना खात्रीशिर गोपनिय माहिती मिळाली की, भिवापूर येथे पंढरागोटा परिसरात एका किरायाचे खोली मध्ये रूपेश रामटेकर हा संगणक गेमिंग मशिनद्वारे ग्राहकांकडून पैसे घेवुन पैशाची बाजी लावून हार जीतचा जुगार खेळ खेळवत आहे अशी माहिती मिळल्याने वरिष्ठांच्या आदेश प्राप्त करून स्टाफसह नमुद ठिकाणी कार्यवाही केली असता तिथे एकुण पाच इसम संगणक गेमिंग मशिन चा वापर करून 1 ते 36 आकडयावर सम विषम या आकडयावर पैसे लावून जुगार खेळ खेळतांना व खेळवितांना मिळून आल्याने आरोपी 1) रूपेश विलास रामटेकर रा. वार्ड क्र. 4 भिवापूर, 2) केशव रामदास खनखुरे वय 38 वर्षे, रा. अडयाळ भिवापूर, 3) मुस्ताक अनवर शेख वय 33 वर्षे, रा. वर्ड नं. 8 सिध्दार्थ नगर भिवापूर, 4) कैलास परसरामजी पेठकर वय 32 वर्षे, रा. रामधन चौक भिवापूर, 5) युवराज मारोती सोनवने वय 40 वर्षे, रा. सिध्दार्थ नगर भिवापूर यांचे ताब्यातुन 05 नग संगणक, 05 एलएडी टीव्ही, 08 जैब्रानिक किबोर्ड, 01 माऊस, 01 एयरटेल कंपनीचे वायफाय हॉटस्पाट, 02 विवो कंपनीचे मोबाईल संच, डेल कंपनीचे मॉनिटर, फ्रंट टेक क्लासीक कंपनीचे बंद सिपीयु संगणक संच जोडणीचे साहित्यासह 02 नग बंद तिकीट प्रिंटर, 02 नग बारकोड स्कॅनर, 03 प्लास्टीक खुर्ची, 01 प्लास्टीक स्टूल, नगदी 33,070/– रोख रक्कम असा एकूण 2,02,690/– रू चा मुद्दमाल मिळून आल्याने गेम पार्लर मालक व 04 जुगार खेळतांना मिळून आलेले इसम यांचेविरूध्द 4, 5 महा. जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात पोनि अनिल जिट्टावार, सपोनि राजीव कर्मलवार, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोहवा राजेंद्र सनोडिया, नरेंद्र पटले, निलेश बर्वे, पोना दिनेश आधापुरे, पोशि अजिज दुधकनोज, बालाजी साखरे, चापोहवा भाऊराव खंडाते यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा साहुली शिवार येथे दिनांक 17/11/2021 चे 06.05 वा. ते 06.50 वा. दरम्यान पारशिवनी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पारशिवनी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–31/ इके– 0213 क्रमांकाच्या स्कॉर्पीयो गाडीला थांबविले असता सदर वाहन चालक आरोपी हा वाहन सोडून पसार झाला. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये 6(गाई,बैल) जनावरे कि. 60,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 4,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. संदीप कडु, पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)ऐ, डी, ए, ई, एफ आय प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री संदीपान उबाळे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन पारशिवनीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हृदयनारायण यादव, पोलीस उपनिरीक्षक श्री संदीपान उबाळे, पोलिस नाईक श्री संदीप कडु, श्री मुद्दसर जमाल, श्री अमित यादव यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## चोरी

1) पो.स्टे. काटोलः– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील रोशन वंजारी यांचे शेतात काटोल शिवार येथे दि. 16/11/2021 चे 00.00 वा. ते दि. 18/11/2021 चे 04.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गिरीश वालदास लढढा वय 51 वर्ष रा. धंतोली ता. काटोल यांचे 03 आयसर कंपनीचे टिप्पर ट्रक व एक सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर असे असुन त्याचे आयसर कंपनीचे ट्रक 1) एम.एच–40/एन–3676, 2) एम.एच– 40/बीजी– 0547, 3) एम.एच– 40/बीजी– 3702 व एक सोनालिका कंपनीचे ट्रक एम.एच.–40/एल–714 या वाहनामधील बॅटरी व टायर असे एकुण 95,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास प्रो.पोउपनि श्री लांजेवार 9764190951 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेकः– अंतर्गत 04 कि.मी. अंतरावरील मौजा गडमंदीर रामटेक येथे दि. 14/11/2021 चे 05.00 वा. ते दि. 17/11/2021 चे 11.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शैलेद्र संतोष उईके, वय 37 वर्ष रा. टेलीफोन ऐक्सचेंज क्वॅाटर रामटेक यांचे देखरेख खाली बीएसएनएल टावर वर लावलेले काळया रंगाचे एक इंच रुंदी, 150 फुट लांब असे 6 केबल कि. 10,000/–रु. तसेच त्याच टावर वर लावलेले पोलीस वायरलेस विभागाचे काळया रंगाचे अर्धा इंच रुंद व 300 फुट लांब किंमत 30,000/–रू. असा एकुण कि. 40,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने कापुन चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सदाशिव काठे मो नं. 9011326793 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. बेला :—दिनांक 16/11/2021 चे 13:00 वा. ते 17.00 वा. चे सुमारास फिर्यादी यांच्या 15 वर्षीय पीडित मुलीला आरोपी नामे— उद्धव जयवंतराव लांबट, वय 31 वर्ष, रा. बोरगाव लांबट जबरदस्तीने त्याचे सोबत मोटरसायकल वर घेवुन जावुन तिचे सोबत जरदस्तीने शारीरिक संबंध करून तिला थापडा मारून सदर बाब कोणाला सांगीतल्यास जिवाने मारन्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376, 376 (2)(आय),323,506 भादंवि. सहकलम 4, 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम 3(1)(11) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. पंकज वाघोडे हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील मौजा अंबाडा येथे दिनांक 05/11/2021 चे 15.00 वा. दरम्यान सौ.रत्नमाला प्रकाश बांगर(मृतक) वय 50 वर्ष रा. अंबाडा (सायवाडा)ता. नरखेड जि. नागपुर ही आपले राहते घरी दिवाळीचे फराळाचे तळतांना वरील मातीचे तेलाचा दिवा तिचे अंगावर पडल्याने अचानक आगीने पेट घेतल्याने ती एकुन 40 टक्के जळली. तिला उपचारकामी प्रथम पि.एच.सी. वरुड जि. अमरावती व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. 05/11/2021 चे 07.45 वा. येथे भरती करण्यात आले होते. उपचार दरम्यान वार्ड चे एच.ओ. यांनी तिला तपासुन दि. 16/11/21 चे 06.00 वा. डॉक्टरांनी मृत घोषीत केले. मृतक यांचे मेडीकल पोलीस बुथ नागपुर येथुन कागदपत्रे पोस्टे. जलालखेडा ला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे विकास बेलसरे मेडीकल बुथ नागुपर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मोरश्वर चलपे मो.क्र. 9767581044 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर